# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३०२/२०२२ दिनांक : ०५/१०/२०२२

## प्रोफेशनल पोलीसींग या विषयावर मांडवी पोलीसांची कार्यशाळा.

प्रोफेशनल पोलीसींग, पोलीसांची नेमकी कामे आणि वास्तव परिस्थिती या विषयावर आज दिनांक ५/१०/२०२२ रोजी मांडवे पोलीस ठाणे येथ्रील नेमणुकीस असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री अरुण वाबळे यांनी उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सदर कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले असून पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आपले कर्तव्य करतांना कायदयाच्या चाकोरीमध्ये राहून सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा व त्यांचे न्याय हक्काबाबत संवेदनशील राहून कसे कर्तव्य बजावले पाहिजे याबाबत मत व्यक्त केले. मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १/१०/२०२२ ते ७/१०/२०२२ पावेतो पोलीसांकडून विशेष सप्ताह राबविण्यात येत असून सदर मोहिमेअंतर्गत उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.






सदर कार्यक्रमाचेवेळी श्री रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, श्री प्रफुल्ल वाघ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मांडवी पोलीस ठाणे व इतर पोलीस अधिकारी/अंमलदार उपस्थित होते.

----ooo----